# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३८३-२२** **दिनांक १३/१२/२०२२**

## मोबाईल स्नॅचिंग करणाऱ्या व मोबाईलच्या आकाराची काच एका पाऊचमध्ये ठेवुन तो मोबाईल आहे असे भासवुन लोकांची फसवणुक करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचे ४ आरोपी जेरबंद.
## काशिमीरा पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक १०.१२.२०२२ रोजी काशिमीरा मुंशी कंपाउंड येथील मुंबई-अहमदाबाद हायवे लगत असलेल्या सेल पेट्रोल पंपाजवळील रोडवर तक्रारदार श्री. अजादार मोहम्मद नुर मोहम्मद खान, वय-१९ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. रुम नं.२, लाईन नं. टी, प्लॉट नं.३५, रोड नं.६, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई हे काम करित असताना एका अनोळखी इसमाने तक्रारदार यांना मोबाईल दुकानाबाबत विचारुन बोलण्यात गुंतवुन त्यांचा मोबाईल घेवुन त्याबदल्यात काच असलेला काळया कपडयाचा पाऊच त्यात तक्रारदार यांचा मोबाईल असल्याचे भासवुन दिला. तसेच त्यावेळी सदर ठिकाणी आरोपीताचा दुसरा साथीदार इसम काळया रंगाच्या शाईन मोटरसायकलवरुन येवुन ते दोघेही तक्रारदार यांचा मोबाईल फोन चोरुन घेवुन जात असल्याचे तक्रारदार यांचे लक्षात आल्यानंतर तक्रारदार यांनी त्या दोघांना पकडण्याचा प्रयत्न केला असता त्या दोन्ही ईसमांनी तक्रारदार यांना हिसका दिल्याने तक्रारदार हे जमीनीवर पडल्याने त्यांचे डाव्या हाताला, पायाला, व डोक्याला खरचटुन जखम झाली होती. सदर घटनेबाबत काशिमीरा पोलीस ठाणे येथे तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.नं ८६५/२०२२, भा.द.वि कलम ३९२,३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

त्याचप्रमाणे काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत चार अनोळखी ईसम हे मोटरसायकली वरुन येवुन त्यांचेकडे असलेला मोबाईल फोन नागरीकांना खरेदी करण्याचे अमिष दाखवुन किंवा सदर मोबाईलच्या बदल्यात नागरिकांकडे मोबाईल हस्तांतरीत करण्याचा बहाणा करुन त्यांच्याकडील मोबाईल फोन पाहाण्यासाठी घेत असत नागरिकांनी मोबाईल फोन खरेदी करण्यास नकार दिल्यास ते हातचालाखीने किंवा जबरदस्तीने मोबाईल फोन हिसकावुन घेत असल्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत होती. त्याअनुषंगाने नमूद घटनांना प्रतिबंध करण्यासाठी व दाखल असलेल्या गुन्हयांचा तपास करण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी काशिमिरा पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदारांना सूचना दिल्या होत्या.

काशिमिरा पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदारांनी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या व तांजिक विश्लेषणाद्वारे आरोपीतांना कुर्ला (प) मुंबई या ठिकाणाहुन ताब्यात घेवुन दिनांक ११/१२/२०२२ रोजी अटक केली. आरोपीतांकडे सखोल तपास करुन त्यांच्याकडून विविध कंपन्याचे एकुण २८ मोबाईल फोन व गुन्हयाचे वेळी वापरलेल्या ०२ होंडा शाईन मोटरसायकल क्र. १) UP15/DS/0980, २) UP15/DL/5414 असा एकूण ५,७४,०००/- रु. किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला.

## अटक आरोपीतांची नावे व पत्ते

| अ.क्र | अटक आरोपीचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| १. | सोनु नुरमोहंमद मलिक, वय २९ वर्षे | मेरठ, उत्तर प्रदेश. |
| २. | दानिश जाहीद मलिक, वय २७ वर्षे, | मेरठ, उत्तर प्रदेश. |
| ३. | मोहमद साजीद अब्दुल कादीर राजपुत, वय २८ वर्षे, | मेरठ, उत्तर प्रदेश. |
| ४. | सागर विनोद वर्मा, वय २० वर्षे, | शहादरा, नवी दिल्ली |

## उघडकीस आलेल्या गुन्हयांची माहिती खालीलप्रमाणे .

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा नोंद क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | काशिमिरा पोलीस ठाणे | गु.र.क्र.८६५/२०२२ कलम ३९२,३४ भा.दं.वि.सं |
| २. | काशिमिरा पोलीस ठाणे | गु.र.क्र.८६९/२०२२ कलम ३९२,३४ भा.दं.वि.सं |
| ३. | काशिमिरा पोलीस ठाणे | गु.र.क्र.८६६/२०२२ कलम ३७९,३४ भा.दं.वि.सं |
| ४. | काशिमिरा पोलीस ठाणे | गु.र.क्र.८६७/२०२२ कलम ३७९,३४ भा.दं.वि.सं |
| ५. | काशिमिरा पोलीस ठाणे | गु.र.क्र.८३/२०२२ कलम ३७९,३४ भा.दं.वि.सं |
| ६. | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र.९५४/२०२२ कलम ३९२,३४ भा.दं.वि.सं |
| ७. | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र.९५६/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि.सं |
| ८. | नयानगर पोलीस ठाणे | गु.र.क्र.६७१/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि.सं |
| ९. | भाईदर पोलीस ठाणे | गु.र.क्र.५८४/२०२२ कलम ३७९,३४ भा.दं.वि.सं |
| १०. | खडकपाडा पोलीस ठाणे | गु.र.क्र.४९४/२०२२ कलम ३७९,३४ भा.दं.वि.सं |
| ११. | पेल्हार पोलीस ठाणे | गु.र.क्र.४३०/२०२२ कलम ४२०,४०६,३४ भा.दं.वि.सं |
| १२ | गोवंडी पोलीस ठाणे | गु.र.क्र.६१८/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि.सं |

अशा प्रकारे नमूद आरोपीतांकडून काशिमिरा पोलीस ठाणेस दाखल असलेले ५ गुन्हे, नवघर पोलीस ठाणेस दाखल असलेले २ गुन्हे, नयानगर, भाईंदर व पेल्हार पोलीस ठाणेस दाखल असलेले प्रत्येकी १ गुन्हे व खडकपाडा पोलीस ठाणे, गोवंडी पोलीस ठाणे येथे दाखल असलेला प्रत्येकी १ गुन्हा असे एकूण १२ मालमत्ते संदर्भातील गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ १, श्री. शशिकांत भोसले सहाय्यक पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग, (अति.कार्यभार. मिरारोड विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली काशिमिरा पोलीस ठाण्याचे व.पो.निरी. श्री. संजय हजारे, पो.नि. विजय पवार (गुन्हे), स.पो.निरी. श्री प्रशांत गांगुर्डे, पोलीस उप निरीक्षक श्री. निखील चव्हाण, पो.उपनिरीक्षक (श्रेणी) श्री. प्रकाश कावरे, पो.हवा. सचिन हुले, हणुमंत तेरवे, परेश पाटील, निलेश शिंदे, सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, पो.अंम. रविंद्र कांबळे सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे व पो. हवा. जयप्रकाश जाधव (पो.उ.आ. कार्यालय,परिमंडळ १ यांनी केलेली आहे.

-----0000-----